दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २०२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०४ मार्च २०२५







## थोडक्यात

### शहरातील रस्त्यांच्या धुळीमुळे हदगावकरांचे आरोग्य धोक्यात

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०३, हदगाव (नांदेड) :** हदगांव हा जुना तालुका असुन शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.परंतु नागरिकांना सुविधा मात्र मिळत नाहीत.

शहरातील मुख्य रस्त्या म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुनं बसस्थानक हा आहे. या रस्त्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर धूळ साचलेली आहे,की रस्त्याने नागरिकांना पायी जाणे सुध्दा सोपे नाही.या धुळीमुळे हदगावकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.यामुळे श्वसनाचे आजार होण्याची शक्यता आहे.कोरोना या महामारीतुन बरे झालेल्या लोकांना याचा अतोनात त्रास होत आहे.परंतु याकडे नगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे नागरीकांत बोलल्या जात आहे. नवीन झालेल्या एकाठिकाणचा निकृष्ट रोड उखडून टाकला असुन त्यामुळे दोन्ही बाजूंच्या दुकानात या रस्त्याची धुळ जावुन दुकानदारी करणे सुध्दा अवघड झाले आहे.तरी या धुळीकडे वेळीच लक्ष देवुन नगरपालिका प्रशासनाने नागरिकांचे होणारे हाल थांबवावे. व भविष्यात येणाऱ्या आरोग्याच्या समस्या, सोडविण्यासाठी यावर लवकर उपाय करावा. असे नागरीक बोलत आहेत.

### कांदळवनात थरारनाट्य!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नवी मुंबई :** आज सकाळी साडेसहा पासून पोलीस तीन संशयितांचा पाठलाग वाशी परिसरात करत आहेत. वाशीतील मिनी सी शोर परिसरात असणाऱ्या कांदळवनात हे तीन संशयित घुसल्याने पोलिसांच्या समोर त्यांना शोधण्याचे आव्हान आहे अथक प्रयत्न आणि वेगवान हालचाली मुळे एक संशयित पोलिसांच्या हाती लागला आहे.

पनवेल परिसरात घरफोडी व अन्य काही गुन्ह्यातील तीन संशयित वाशीत असल्याची माहिती गुन्हे शाखा परिमंडळ दोनच्या युनिटला मिळाली. या माहितीच्या आधारावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तात्काळ वाशीतील मिनी सी शोर परिसरात दाखल झाले. संशयित एका गाडीत असल्याचे समजताच या गाडीचा पाठलाग पोलिसांनी सुरू केला. पोलिसांची चाहूल लागताच तिन्ही संशयितांनी गाडी सागर विहार कडे वळवली . मात्र रस्ता माहिती नसल्याने सेक्टर आठ येथील नर्सरीकडे वळवली पुढे रस्ता बंद आहे. नेमके त्याच्या गाडीच्या स्टेअरिंग रॉड तुटल्याने गाडी एका ठिकाणी आदळली. संशयितांनी येथील गर्द कांडाळवनाचा आधार घेत पळून गेले. मात्र पोलिसांनी थेट जंगलात घुसून शोध मोहीम सुरू केली. यासाठी ड्रोन कॅमेराचे साहाय्य घेण्यात आले. मात्र गर्द झाडी आणि ड्रोन कॅमेराच्या सीमा असल्याने फारसे हाती लागले नाही. तसेच घटनास्थळी श्वान पथक दाखल झाले होते. अशी माहिती सूत्रांनी दिली सकाळी सातच्या सुमारास पोलिसांच्या हाती एक संशयित लागला आहे. आमचे शोधकार्य सुरू आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

# रणरणत्या उन्हात शेतकऱ्यांचा एल्गार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०३, बुलडाणा :**

विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाने मिळालेल्या धक्क्यातून सावरलेली काँग्रेस अखेर आज रस्त्यावर उतरली. प्रदेश काँग्रेसच्या निर्देशांनुसार आज सोमवारी,राज्यभरात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी एल्गार मोर्चे काढण्यात आले. बुलढाण्यात काढण्यात आलेल्या मोर्चा निमित्त काँग्रेसमध्ये उत्साह निर्माण झाल्याचे दिसून आले.

महायुती सरकारकडून निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे वारंवार सांगण्यात आले. जाहीरनाम्यात सातबारा कोरा करु असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्यापही शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली नाही.




यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी या मुख्य मागणीसाठी आज बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा काढण्यात आला. सोयाबीन, कापूस, तुरीला हमीभाव नाही. नाफेड अंतर्गत सुरु असलेली खरेदी सरकार जाणीवपूर्वक संथ गतीने करत आहे. थकलेला पीक विमा, सिंचन अनुदान व यासह शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी एल्गार मोर्चा काढण्यात आला. जयस्तंभ चौकातील गांधी भवन येथून दुपारी सव्वा दोनच्या सुमारास या मोर्च्याला प्रारंभ झाला. जिल्हाध्यक्ष राहुल बोन्द्रे, श्याम उमाळकर, लक्ष्मण घुमरे, रशीदखान जमादार, अडव्होकेट विजय सावळे, चित्रांगण खंडारे, हरीश रावळ, दत्ता काकस, सत्येद्र भुसारी, महिला आघाडी अध्यक्ष मंगला पाटील , सतीश महेंद्रे, सुनील सपकाळ, अंबादास बाठे श्लोकानंद डांगे, सेवादलचे प्रकाश धुमाळ, एनएसयुआय चे शैलेश खेडकर यासह काँग्रेस, महिला, अनुसूचित जाती, कामगार, इंटक आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोर्च्यात बहुसंख्येने सहभागी झाले. गांधीभवन येथून निघालेला मोर्चा जिल्हा परिषद मार्ग, स्टेट बँक चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यलयावर येऊन धडकला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत राज्य सरकारला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यानंतर जिल्हाध्यक्ष बोन्द्रे यांनी मोर्च्याला संबोधित केले.

**कर्जमाफीचे काय? : राहुल बोंद्रे**

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल बोन्द्रे यांनी केंद्र व राज्य सरकारवर आसूड ओढले. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नाकडे राज्य सरकार सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे. महाराष्ट्रातील महायुती शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी सारखी अनेक आश्वासने दिली आहेत, मात्र त्यांच्या पुर्ततेसाठी राज्य शासनाकडून कोणतेही प्रयत्न सुरू नाहीत. तसेच शेतमालाचे हमीभाव, थकीत, भावांतर योजना पीकविमा यासह इतर अनेक प्रश्न कायम आहे. या कारणास्तव शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असल्याचे माजी आमदार राहुल बोंद्रे म्हणाले. कुंभकर्णी झोपेतून सरकारला जागे करण्यासाठी आजचा मोर्चा काढण्यात आला असे ते म्हणाले.

# 'पनवेल मनपा'ने केली थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणीची कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, पनवेल :** महापालिकेच्यावतीने थकबाकी दारांच्या मालमत्ता अटकावणी मोहीमेस जोमाने सुरूवात केली आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून गेल्या तीन दिवसामध्ये १२ मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनात महापालिकेच्यावतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारां विरोधात पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या विविध जप्ती व अटकावणी पथकाच्या माध्यमातून वेगाने कारवाई केली जात असून, दररोज कोटीच्या घरामध्ये मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा होत आहे. आयुक्तांनी दिलेल्याआदेशनूसार आज दि.०३ मार्च रोजी मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकी दारांवरती प्रत्येक विभागातील वसुली पथकाने कारवाई केली असून यामध्ये खारघर पथकाने गुडवील इन्फीनीटी सोसायटीच्या तीन मालमत्तांवरील थकीत कराच्या कारवाई अंतर्गत सोसायटीच्या कार्यालयावर देखील अटकावणी कारवाई करण्यात आली आहे. तसेच ज्योत्स्ना प्राईम फिटनेस वरती देखील अटकावणी कारवाई करण्यात आली. तसेच कामोठे पथकाने अटकावणी एस.एम. हाडे पाटील मालमत्तेवर अटकावणी कारवाई केली. याबरोबरच कळंबोली पथकाने मार्बल मार्केट जे.बी. मार्बल प्लॉट नंबर ३४,३५,३६ कंपनी, मार्बल मार्केट



नारायण रावरिया प्लॉट ११८ यांच्यावरती अटकवणी करण्यात आली. तळोजे एमआयडीसी पथकाच्यावतीने भारत कोच बिल्डर्स प्रा ली प्लॉट. सी-२८ यांच्यावर अटकवणी केली. कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. वसुली कारवाईला गती देण्यासाठी वसुली टिममध्ये वाढ करण्यात आली आहे. अटकावणी कारवाई अधिक तीव्र केल्यामुळे मालमत्ता कर भरण्याकडे मालमत्ता धारकांचा कल वाढू लागला आहे. जानेवारी महिन्यात महापालिकेने २७ मालमत्तांवर अटकावणी कारवाई केली तर फेब्रुवारी महिन्यात २१ मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली. परंतु अटकावणी केलेल्या मालमत्तांधारकानी आपला अधिकांश मालमत्ता कर भरल्याने यांच्यावरील कारवाई रद्द करण्यात आली आहे. महापालिकेने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'पीएमसी टॅक्स ॲप' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## विस्तार अधिकार्यांमार्फत होणार ग्रामपंचायतींची क्रॉस तपासणी !
### मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रम ! १० मार्चपर्यंत तयार होणार अहवाल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वाकांशी १०० दिवस विशेष कार्यक्रमात जिल्ह्यात ग्रामपंचायत पातळीवर राबवण्यात येणार्या उपक्रमाची शंभर टक्के अंमलबजावणी सुरू आहे, की नाही याची तालुकास्तरावर विस्तार अधिकारी ग्रामपंचायत यांच्या वतीने क्रॉस तपासणी करण्यात येणार आहेत.

याबाबतचे आदेश जिल्हा ग्रामपंचायत विभागाने काढले असून या तपासणीचा अहवाल १० मार्चपर्यंत सादर करण्याचे आदेश म्हटले आहे. जिल्ह्यात गेल्या ६० दिवसांपासून मुख्यमंत्री शंभर दिवस विशेष कार्यक्रम सुरू आहे. हा कार्यक्रम सर्व शासकीय विभागांना लागू असून यात ग्रामपंचायतींना देखील सहभागी करण्यात आलेले आहे. राज्य पातळीवरून मुख्यमंत्री शंभर दिवस विशेष कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्यादृष्टीने दर आठवड्याला प्रशासकीय बैठका घेऊन आढावा घेण्यात येत आहे.

स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी देखील राज्यातील सर्व शासकीय विभागाच्या अधिकार्यांची ऑनलाईन बैठक आढावा घेतलेला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यात येणार्या या विशेष १०० दिवस कार्यक्रमाच्या फलश्रुतीची तपासणी राज्य पातळीवरून त्रयस्थ यंत्रणांकडून करण्यात येणार आहे. यामुळे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला महत्त्व आले आहे. यामुळेच जिल्हा परिषदच्या ग्रामपंचायत विभागाने जिल्ह्यातील १ हजार ३०० ग्राम पंचायतमध्ये राबविण्यात असलेल्या या सात कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची ४ ते ७ मार्चदरम्यान तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात प्रत्येक तालुक्यातील गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी यांनी ग्राम पंचायतींना भेटी देऊन त्या ठिकाणी सुरू असणाऱ्या कामाचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक तालुक्यातील ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी यांच्या मार्फत अन् तालुक्यातील ग्रामपंचायतीची तपासणी करण्यात येणार आहे. या बाबतचे आदेश जिल्हा परिषद पातळीवरून २८ फेब्रुवारीला काढण्यात आले आहेत.

## १७ वर्षीय मुलीवर पेट्रोल ओतून पेटवले !

**दि.०३, मुंबई :** मुलीच्या आईने भेटण्यास विरोध केल्यामुळे ३० वर्षीय तरूणाने १७ वर्षीय मुलीच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिल्याचा प्रकार अंधेरी पूर्व येथे घडला. याप्रकरणी अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. मुलगी गंभीर भाजली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. आरोपीने पेट्रोल ओतून पेटवून दिल्यामुळे पूजा विजय वाघमारे ६० टक्के भाजली असून ती कूपर रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. आरोपीही या घटनेत भाजल्यामुळे त्याच्यावरही सध्या उपचार सुरू आहेत. पूजा तीन भावंड आणि पालकांसोबत अंधेरी (पूर्व) येथील मरोळ परिसरात राहते. तिचे वडील चालक असून, मोठा भाऊ खासगी कंपनीत काम करतो. तिची आई, वंदना वाघमारे (३८) या कपडे शिवण्याचे काम करतात. पूजाच्या आईने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, पूजा गेल्या दीड वर्षांपासून आरोपी जितेंद्र चंद्रकांत तांबे उर्फ जितूला ओळखत होती. तोही त्याच परिसरात राहतो. सुमारे सहा महिन्यांपूर्वी, शेजाऱ्याने पूजाच्या आईला ती जितूसोबत परिसरात फिरत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पूजाच्या आईने जितूला समज दिली आणि तिला भेटण्यास मनाई केली. रविवारी उशिरा रात्री, पूजाच्या आईला एका स्थानिक व्यक्तीचा दूरध्वनी आला. त्याने पूजावर कोणीतरी पेट्रोल ओतून तिला पेटवल्याचे सांगितले.

## श्री विठ्ठल-रुक्मीणी मंदिर समितीच्या गैरकारभारा विरोधात वाल्मिकी संघाचे कार्यकर्ते आक्रमक



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास मध्ये श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची बैठक सुरू असतानाच गेल्या अनेक दिवसांपासून मंदिर समितीच्या गैरकारभार विरुद्ध आवाज उठवणारे पंढरपूर येथील समाजसेवक गणेश अंकुशराव व महर्षी वाल्मिकी संघाच्या कार्यकर्त्यांनी या बैठकीत येऊन निषेधाच्या जोरदार घोषणा दिल्या.

यावेळी बोलताना गणेश अंकुशराव यांनी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी श्री.शेळके व व्यवस्थापक श्री.श्रोत्री यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त करताना मंदिर समितीच्या कारभाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. पंढरपुरातील स्थानिक नागरिकांना दर्शनासाठी ची वेळ वाढवून दिली जात नाही, मंदिराचे संवर्धनाचे कामात घोटाळा आहे, मंदिर समितीकडून महिला भाविकांसाठी अत्यावश्यक सुविधा पुरवल्या जात नाहीत, विठ्ठल रूक्मिणीमाता विवाह सोहळ्यात देवाला बाशिंग बांधले गेले नाही, देवाच्या जलद दर्शनासाठी सोडणारे एजंट सापडले त्यांचेवर कारवाई झाली, पण दोषी अधिकारी मोकाट आहेत, साक्षात पांडुरंगासोबत विष्णु पदावर आलेला गोवंश चंद्रभागेच्या पात्रात मोकाट फिरत असुन यांचे अस्तित्व धोक्यात आहे, याकडे मंदिर समिती दुर्लक्ष करत आहे. मंदिर समितीचं माघी वारीत मागील वर्षी पेक्षा उत्पन्न का घटलंय ? टोकन दर्शन व्यवस्था सुरू करावी, मंदिर समिती च्या स्वच्छता टेंडरमध्ये मोठा घोटाळा आहे याकडे मंदिर समिती दुर्लक्ष करत आहे. यासह अनेक प्रश्न उपस्थित करत मंदिर समितीच्या गैरकारभाराचा पाढा वाचून दाखवला.

## संपादकीय



### फिरकीचा जादूगार...

बरोबर तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज दोन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ॲशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे. शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता. शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता. निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतपद मिळवून दिले. शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## वीज व समाज यांना जोडणारा सेतू – लाईनमन !!

वीज हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भारतामध्ये विद्युत प्रकाशाचा पहिला प्रयोग २४ जुलै १८६९ मध्ये कोलकाता येथे झाला. भारतातील सर्व खेड्यापाड्यांमध्ये विद्युत वीज पोहोचली आहे. त्यासाठी महामंडळ व इतर वीज कंपन्या चोवीस तास मेहनत घेत आहे. सर्व खेड्यापाड्यातील प्रत्येक घरात वीज पोहोचून नेण्याचे कार्य त्यांनी अतिशय प्रकर्षाने केले आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये अधिकारी वर्गाबरोबर विजेचा माध्यमातून प्रकाश पोहोचवणारा लाईनमन हा तितकाच महत्त्वाचा घटक आहे.शहरी भागातून ते खेड्यापाड्यात लाईनमन प्रत्येक घराघरांमध्ये विजेच्या माध्यमातून प्रकाश पोहोचवण्याचे कार्य करत असतो. मुख्य विजेच्यायुनिटपासून ते गावातील प्रत्येक गल्लीतील विजेच्या खांबावर तार, वायर बसवून त्याची योग्य प्रकारे जोडणी करत असतो. ऊन,वारा,पावसामध्ये जीव धोक्यात घालून सदैव झटत असतो. वीज घटक हा अतिशय संवेदनशील घटक आहे. थोड्याशा निष्काळजी किंवा दुर्लक्षाने कोणत्याही क्षणी जीवावर बेतल्या जाऊ शकते परंतु, एवढ्या गंभीर व जीव घेण्या परिस्थितीतही इथे आपले कार्य अगदी एकनिष्ठने पार पाडत असतात.वीजवितरण कंपनी व विभागानुसार आपल्या सर्व घरा घरात विज पोहोचवण्यासाठी लाईनमला काही जबाबदाऱ्या ठरवून दिल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आपपल्या कार्यक्षेत्रामध्ये विजेची हानी होणार नाही. वीज चोरी होणार नाही. याची दक्षता घ्यायची आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास तक्रारदारांच्या समस्येचे तातडीने निराकरण करणे. वितरित केंद्रातील ठिकानांची देखभाल व दुरुस्ती करणे. नवीन विद्युत जोडणी करणे.विजेचे मीटर बदलून देणे. वेळीवेळी नागरिकांना विजेची बचत व काळजी कशी घायची याचे मार्गदर्शन करणे. हे सर्व कार्य लाईनमन व्यवस्थित पार पाडतो त्यामुळे,सद्या विजेसंबंधिच्या अडचणी खूप दूर झाल्या आहे.

लाईनमन त्यांच्या जबाबदाऱ्या विद्युत तंतोतंत पार पाडतो मात्र, त्याचबरोबर आपण ग्राहक किंवा नागरिक म्हणून आपल्याही काही जबाबदाऱ्या आहे जसे कि,विद्युत वापरासाठीच्या घरगुती, शेती, उद्योग इत्यादीमधील संचमांडणीच्या कामाची उभारणी, देखभाल व दुरूस्तीची कामे ही योग्य तांत्रिक ज्ञान असलेल्या, मान्यताप्राप्त व प्रशिक्षित व्यक्तीकडूनच करवून घ्यावी.विद्युत संचमांडणीमध्ये वापरण्यात येणारे साहित्य व उपकरणे ही दर्जेदार व शक्यतो आय.एस.आय. प्रमाणित असल्याची खात्री करून घ्यावी. विद्युत संचमांडणीत कार्यक्षम अर्थिंग असणे अत्यावश्यक आहे व सर्व विद्युत उपकरणे कार्यक्षम अर्थिंगसोबत जोडलेली असावीत. विद्युत संचमांडणीत इ.एल.सी.बी. चा वापर असावा. संचमांडणीतील वायर्स व इतर साहित्य विद्युत भारानुसार योग्य क्षमतेचे असावे. स्वीच बोर्ड, प्लग सॉकेट्स इत्यादी लहान मुलांचा हात सहज पोहचेल, अशा ठिकाणी लावू नयेत. प्लग सॉकेट्समधून विद्युत पुरवठा घेताना उघड्या वायर्स प्लग सॉकेट्समध्ये न खोचता, थ्री पीन टॉपचाच वापर करावा. एकाच सॉकेटमध्ये अनेक प्लग-पीन वापरून ओव्हरलोडिंग न करता वेगवेगळ्या उपकरणांसाठी वेगवेगळे प्लग-पीन वापरावेत.विद्युत उपकरणे विद्युत पुरवठ्याशी जोडलेली असताना ती ओल्या हाताने हाताळू नये. विद्युत पुरवठ्याचे स्वीच ओल्या हातांनी चालू/बंद करू नये. शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग विझविण्यासाठी पाण्याचा वापर करू नये, तसेच मुख्य विद्युत प्रवाह त्वरीत बंद करावा. मीटर रूम, पंपरूम, लिफ्ट मशीन रूमचा



वापर सामान ठेवण्यासाठी करू नये. लघुदाब/उच्चदाब वाहिन्यांच्याजवळ मुलांना पतंग उडवू देवू नये. विद्युतवाहक ताराजवळ कपडे वाळत घालू नये. कपडे वाळत घालण्यासाठी वापरलेली धातूची तार किंवा वायर ही कुठल्याही माध्यमातून, विद्युतभारीत तारेशी, अर्थिंग तारेशी, विद्युत उपकरणाशी किंवा विद्युतवाहिनीच्या खांबाशी संपर्कात आलेली नसेल, याची निश्चित खात्री करावी. विद्युत वाहक तारेचा किंवा वायरचा वापर कपडे वाळत घालण्यासाठी करू नये. विजेच्या ताराखाली किंवा त्या तारांपासून असुरक्षित अंतरापर्यंत घराचे अथवा कुठलेही बांधकाम करू नये. विद्युत वाहिनीजवळील झाडे वरील तारमार्गाच्या संपर्कात येत असल्यास ती तोडण्यापूर्वी त्याची सूचना वीज पुरवठाकार कंपनीस द्यावी. त्यांच्याकडून तारमार्गातील विद्युत पुरवठा बंद केल्यानंतरच झाडे तोडण्याची कामे करण्यात यावीत.अश्या या बारीक सारीक गोष्टीचे पालन व जबाबदाऱ्या नागरिक म्हणून आपण घेतल्या तर लाईन मन च्या काही अंशी समस्या व अडचणी टळतील.

लाईनमनला जनमित्र म्हणून सुद्धा ओळखले जाते. सद्या लाईनमन म्हूणन महिला कर्मचारी सुध्दा कार्यरत आहे. त्या सुद्धा पुरुषांप्रमाणे विजेच्या खांबावर चढून खंडित झालेला विजेचा प्रवाह हा सुरळीत करण्यासाठी सतत झटत असतात व विजेच्या माध्यमातून घरे प्रकाशमान करतात. लाईनन हा वीज वितरणच्या व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. वीजवितरणचे जनमित्र, लाईनमन ऊन, वारा, पाऊस तसेच इतरही अत्यंत खडतर परिस्थितीत ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ते चोवीस तास सेवा देतात. विजेच्या संदर्भातील कार्य हे खरोबरच खडतर व जीवावर बेतणारे आहे म्हणून वीज वितरण कंपनी तथा महा मंडळ यांनी सरकारच्या वतीने जीवन सुरक्षा विमा उपलब्ध करून दयायला हवे त्याचबरोबर जोखीम भत्ता व इतर सवलती उपलब्ध करून द्यायला हवी हिच अपेक्षा...!

लाईनमन यांच्या कार्याची,समर्पणाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व त्यांचा सन्मान म्हणून केंद्र सरकारने ४ मार्च २०२३ पासून राष्ट्रीय लाईनमन दिवस' साजरा करण्याचे ठरवले आहे. वीज (ऊर्जा) क्षेत्रातील महत्वाचा स्तंभ किंबहुना ऊर्जा आणि सम ाज यांना जोडून ठेवणारा सेतू संबोधल्या जाणाऱ्या लाईनमन प्रती कृतज्ञता आणि त्यांचा कार्याला सलाम...!

**समस्त लाईनमन कर्मचारी तथा नागरिकांस राष्ट्रीय लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो. ९७६३२८२०७७**

## स्वाधार मनीवाईज कडून नागरिकांना अर्थिक साक्षरतेचे धडे...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०३, पालघर :** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या द्वारे दरवर्षी प्रमाणे २४ ते२८ फेब्रुवारी पर्यंत अर्थिक साक्षरता म्हणून हा आठवडा, वित्तीय सम झदारी, समृद्ध नारी या थीम वर साजरा करण्यात येत आहे. यामध्ये स्वाधार मनीवाईज अर्थिक साक्षरता केंद्र वसई जिल्हा पालघर द्वारे बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकाऱ्याने २८ फेब्रुवारी रोजी पालघर मध्ये ग्रामपंचायत वरखुंटी (कमारे)



गावात आयोजित केला.

यामध्ये गावातील सर्व कुटुंबांना अर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देऊन, जसे फसवणूक आणि त्याची तक्रार निवारण प्रणाली, डिजीटल बँकिंग, सिबिल स्कोअर तसेच सरकारी योजना ज्यामध्ये प्रधानमंत्री जीवन ज्योत विमा, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, सुकन्या समृद्धी योजना या विषयी माहिती देण्यात आली. या सुविधांचा स्वाधार मेळावा लावून सहभागीच्या कुटुंबांना सुविधाचे फॉर्म भरून देण्यात आले. या कार्यक्रमात ग्रामपंचायत वरखुंटी येथील सरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ यांनी उपस्थिती दाखवून कॅम्प ची शोभा वाढवली.

स्वाधार फिनएक्सेस टीम व एफ एल सी इन्चार्ज उज्वला कोकणे उपास्थित होत्या व त्यांचे चांगले सहकार्य मिळाले. वसई सी एफ एल इन्चार्ज पूजा शिवपुरकर ,प्रशिक्षक रचना पाटील उपस्थित होते. स्वाधार मेळावा उत्तम प्रकारे पार पाडण्यात आला.

### चहापान..

अधिवेशनाच्या पूर्वी
आयोजित चहा पान
चालतआलेली नेहमी
पूर्वीपासून प्रथा छान

विरोधक न् सत्ताधारी
तलवारींना एक म्यान
महत्वाचा सद्हेतू हा
प्रथेचासांभाळा म्यान

साधे समन्वयनिमित्ते
खुलाआखाडा मैदान
लढाई आधीचा करार
सैन्य दोन्ही सावधान

संधीमिळाली चांगली
ठेवा सार्थक अवधान
व्याही व्याही विवाही
एकत्र दोन्हीखानदान

संसद हे संवादभवन
चर्चेतून घेई समाधान
लोक शाही सर्वोत्तम
बनवावी सामर्थ्यवान

चालते प्रथा नेहमीची
बहिष्कृत हा चहापान
पक्ष असो ते कुठलेही
विसरतात दोन्ही भान

जन समस्या सोडवणे
प्राधान्य कर्तव्यप्रधान
अर्थसेशन रे अर्थपूर्ण
करायचेअर्थानुसंधाने


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... बातमी

## सांगा कसं जगायचं ?

'सांगा कसं जगायचं?' ही कविता मंगेश पाडगावकर यांची आहे. 'कण्हत कण्हत जगायचं, की गाणं म्हणत जगायचं तुम्हीच ठरवा!' असं म्हणून ते कवितेतून जगण्यास शिकवतात. लहान मुलाची त्याची आई हाताला धरून चालायला शिकवते ; स्वतः च्या हाताने भरवून खायला शिकवते ; बोबडे बोल बोलून बोलायला शिकवते. त्याचा बाप त्याला व्यवहारज्ञान देतो. शाळेतील मास्तर त्याला लिहायला आणि वाचायला शिकवतात.पुढे तेच मुल अनेकांकडून शिकत जाते. खरंच जगायचं कसं हे खूप धडपडून शिकावं लागतं. कवी, लेखक,विचारवंत आणि साहित्यिक ते देखील लोकांना आपापल्या लेखन प्रकारातून खरंतर जगायलाच शिकवत असतात.

गाढवाला घेऊन बाजाराला जाणाऱ्या मुलाला आणि त्याच्या बापाला भेटणारे लोक वेगवेगळे सल्ले देतात. मुलगा गाढवावर बसला असता,भेटलेले लोक म ुलाला नावे ठेवतात.' तू निर्दयी आहेस... बापाला चालायला लावतोस काय ?' असे म्हणून त्याला खाली उतरवतात. त्यानंतर बाप गाढवावर बसतो. पुढे भेटलेले लोक बापाला निर्दयी आहे असे म्हणतात. ते दोघेही गाढवावर बसल्यानंतर लोक त्या दोघांनाही निर्दयी म्हणतात . शेवटी ते दोघे गाढवालाच खांद्यावर घेऊन निघतात. गाढव नदीच्या पुलावरून जाताना, घाबरून उडी मारते. ते नदीत पडते आणि वाहून जाते. अशीच अवस्था माणसाची समाजात वावरत असताना होते. दहा दिशांनी, दहा तोंडाने लोक सल्ले देत असतात. कोणाच्याही तोंडाला हात लावता येत नाही. फुकटचा सल्ला द्यायला जो,तो तयार असतो. आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात तज्ञ सल्लागार मोबदला घेऊनच सल्ला देत आहेत.



त्यांचा सल्ला खरोखरच बहुमोल असतो. यामध्ये आर्थिक सल्लागार हे आपल्या पैशाची गुंतवणूक कशी करायची? याबाबत सल्ला देतात. वैद्यकीय सल्ला देणारे डॉक्टर अनेकांचे प्राण वाचवतात. तज्ञ सल्लागाराकडून सल्ला घेणे केव्हाही उत्तमच असते. ज्याने कोणतेही अर्थविषयक पदवी घेतली नाही किंवा स्वतः आर्थिक प्रगती साधली नाही असा व्यक्ती जेव्हा सल्ला देऊ लागतो, तेव्हा तो सल्ला खड्ड्यात ढकलणाराच असतो. विवाह विषयक सल्ला देणारा आपल्या वैवाहिक जीवनात किती यशस्वी आहे? हे तपासून पाहूनच त्याच्याकडून सल्ला घेतला पाहिजे. ज्योतिषी भविष्य सांगत असतो; परंतु त्याला स्वतःचे भविष्य माहित असते का ? ' दुसऱ्याला सांगतो ज्ञान ;आणि आपण मात्र कोरडे पाषाण!' असे नमुने आपल्याला जागोजागी पाहायला मिळतात.

फुकटचा बिनडोक सल्ला देणाऱ्याचे एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे भान आपल्याला आले,तर जीवनातील अनेक गोष्टी आपण साध्य करू शकू. याउलट तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आपला श्रम,पैसा,वेळ वाचवून जीवनात यशस्वी व्हायला मदत करू शकते.

सांगा कसं जगायचं? हे प्रत्येकाने आपल्या प्रकृतीला, परिस्थितीला, कुवतीला, बौद्धिक क्षमतेला आजमावून ठरवायचं असतं. निर्णय क्षमता वृद्धिगत करून अचूक निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित केलं पाहिजे. 'टप्प्यात आल्यावर कार्यक्रम करण्याचे!' म्हणजेच समय सुचकता जाणीवपूर्वक शिकून घेतली पाहिजे.कोणीही यावे आणि टपली मारून जावे अशी आपली अवस्था होऊ नये, म्हणून स्वतःला 'स्मार्ट 'बनवण्यासाठी आयुष्यभर धडपडले पाहिजे.' सांगा कसं जगायचं?' हा प्रश्न कोणाही येड्या गबाळ्या व्यक्तीला न विचारता स्वतः च्या विवेक बुद्धीला विचारूनच ठरवलं पाहिजे. मंगेश पाडगावकरांनी आपल्या कवितेत दिलेला जीवन जगण्याचा सकारात्म क सल्ला तर कायमच ध्यानात ठेवला पाहिजे. त्यांच्या सल्लयाप्रमाणे -शाप देत बसायचं, की दुवा देत हसायचं?

हे आपण ठरवलं पाहिजे!काळोखात कुढायचं की प्रकाशात उडायचं? यापैकी योग्य निवडलं पाहिजे! काट्यांसारखं सलायचं की फुलांसारखं फुलायचं? याचा देखील सोक्षमोक्ष लावलाच पाहिजे!

**शेवटी,पेला अर्धा सरला आहे**
**असं सुद्धा म्हणता येतं**
**पेला अर्धा भरला आहे**
**असं सुद्धा म्हणता येतं**

सरला आहे म्हणायचं की भरला आहे म्हणायचं हे ठरवून कण्हत कण्हत नाही तर गाणं म्हणत जगूया...

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## नविन बसबाबत सरकार सकारात्मक महाव्यवस्थापकांचा आमदार दातेंना पत्रव्यवहार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३,पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर- नगर मतदारसंघातील राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारात नविन बसेस मिळणेबाबत परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना आमदार काशिनाथ दाते यांनी निवेदन दिले होते. याबाबत महामंडळाचे महाव्यवस्थापक यांनी टप्प्याटप्याने नविन बसेस उपलब्ध करून देण्यात येतील असा पत्रव्यवहार करत आमदार दातेंना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. दाते म्हणाले की, पारनेर आगारातील बसेस या खुप जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे या बसेस मधुन प्रवाशांना प्रवास करणे धोकादायक झाले आहे. प्रवास करताना तालुक्यातील वृद्ध, महाविद्यालयीन व शाळकरी विद्यार्थी, विद्यार्थीनी,रुग्ण व प्रवाशांना खुप अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या मागील २० ते २५ वर्षात पारनेर एस.टी आगारात एकही नवीन बस आलेली नाही. २५ बसेस ची आवश्यकता असल्याचे निवेदन राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना देऊन याबाबत सहकार्य करावे. अशी चर्चा केली होती. त्यानुसारच मंत्री सरनाईक यांनी परिवहन कार्यालयास उचित निर्देश दिले होते. याबाबत वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक यांनी पत्रव्यवहार करत महामंडळाच्या ताफ्यात नवीन बसेस टप्प्याटप्याने येणार आहेत. त्यानुसार पारनेर आगारात बसेस उपलब्ध करण्यात येतील असे सांगण्यात आले.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळावा उत्साहात साजरा



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०३, जव्हार (पालघर) :** जव्हार तालुक्यातील कोगदे ग्रामपंचायत येथे राह फाउंडेशन मुंबई पालघर प्रकल्प आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिलांनी मोठ्या उत्साहात भरघोस प्रतिसाद दिला कार्यक्रमांची सुरुवात प्रथम प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीपप्रजोलनं व प्रतिमापूजन करून सर्वांचे स्वागत करण्यात आले तसेच कोगदे ग्रामपंचायत लोक नियुक्त सरपंच मथुरा भसरा यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. कोगदे ग्रामपंचायत सदस्य राऊत यांनी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना सावित्री बाई फुले यांनी समाजात महिलांची पहिली शाळा पुणे येथे सुरु केल्यामुळे आपण शिक्षणामुळे आपल्याला समाजात मान सन्मान मिळत आहे. आपण शिक्षणामुळे आपल्याला समजत मान सन्मान मिळत आहे. सावित्री बाई फुले यांनी समाजात संघर्ष करून महिलांना अधिकारी मिळवून दिले. त्यामुळे आपल्याला समाजात स्थान आहे. अशा प्रकारे जागतिक महिला दिननिमित्त महिलांना सावित्री बाई फुले विषय मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये एकूण ३०० पेक्षा जास्त महिला उपस्थिती होत्या. तसेच वैयक्तिक खेळ टिकली, संगीत खुर्ची, लिंबू- चमचा, गाणे तसेच सांघिक खेळ क्रिकेट, गोट्यांचा खेळ घेऊन त्यांना बक्षिस दिले. तसेच त्या सर्व महिलांची जेवणाची व्यवस्था केली. तसेच सर्व सहभागी महिलांना स्कार्फ देण्यात आला. तसेच राह फाउंडेशन संस्थाचे सर्वे स्टाफ उपस्थित होते. व आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## शिळग्रामस्थांचा लढा अखेर निवासी नायब तहसीलदार ठाणे यांच्या कोर्टात



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, शिळफाटा (ठाणे) :** अनेक दिवसापासून शिळ ग्रामस्थांच्या हक्काची श्री गावदेवी मंदिराच्या लगत असणारी मिळकत सर्वे नंबर ५७/१, ५७/अ २, ५७/अ ३, ५७/४ एकूण क्षेत्र ४५.६० शिळग्रामस्थांच्या मान्यतेतून निर्मित करण्यात आलेल्या श्री ग्रामदेवता मंदिर ट्रस्टच्या काही ठराविक ४ सदस्यांनी संगतमताने ही जमीन कवडीमोल भावाने विकली आहे.मुंब्रा पनवेल महामार्गावर लगत असलेली ही मिळकत आजच्या बाजार भाव नुसार २५ ते २७ कोटीची असून ती केवळ साडेपाच कोटी रुपयाला विकल्याचे करार करण्यात आल्या आहे. या व्यवहारात संबंधित ट्रस्टीने पैशाचा फार मोठा घोटाळा केला आहे. हा घोटाळा ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर गेल्या ९ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या कराराला ग्रामस्थांनी २१ जानेवारी २०२५ रोजी पासून ग्रामसभा लावायला सुरुवात केली. आणि विरोध दर्शवण्यात सुरुवात केली आहे. अनेक वरिष्ठ नेत्यापासून स्थानिक नेत्यापर्यंत पत्रव्यवहार करून संबंधित मंदिर ट्रस्टी पैकी एक ट्रस्टी एका पक्षाचा पदाधिकारी असून त्या पदाधिकाऱ्याची मुख्य भूमिका या व्यवहारात दिसून येत असल्यामुळे संबंधित पक्षाच्या वरिष्ठ व कनिष्ठ नेतृत्वाकडे सातत्याने शिळ ग्रामस्थांनी पत्र व्यवहार व प्रत्यक्ष भेट घेऊन वस्तुस्थिती समोर ठेवली आहे. परंतु त्या वस्तूस्थितीनुसार संबंधित पक्ष नेत्याने त्या पदाधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई आज पर्यंत केलेली नाही.

परंतु शिळ ग्रामस्थांनी शासन व प्रशासन द्वारे केलेल्या पत्र व्यवहारातून सदर झालेल्या व्यवहारात फेरफार व सातबारात कोणत्याही प्रकारचा फेरबदल न होण्याकरिता नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्याकडे पत्र व्यवहाराच्या पाठपुरावा नुसार आज दि. ३ मार्च २०२५ रोजी नायब तहसीलदार कडे शिळग्रामस्थांना सुनावणीसाठी बोलवण्यात आले होते. त्यावेळी बहुसंख्येने ग्रामस्थ सुनावणीसाठी हजर राहून संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या वकिलामार्फत व प्रत्यक्ष ग्रामस्थांमार्फत झालेले व्यवहाराच्या घोटाळ्या बाबत माहिती दिली. त्यानुसार नायब तहसीलदार यांनी चालू महिन्याची २१ मार्च २०२५ ची पुढील सुनावली तारीख दिली आहे. तरी विनंती कायदेशीर लढा शिळ ग्रामस्थ लढणार आहे. परंतु शिळ ग्रामस्थांची एका विशेष पक्षाकडे आग्रहाची मागणी आहे. त्यांनी त्यांच्या पदाधिकाऱ्याला पदचित करून झालेला व्यवहार रद्द करण्याबाबतची सक्ती करावी. अशी ग्रामस्थांची विनंती आहे.भविष्यात अशा प्रकारे कोणत्याही संघटनेचा कोणत्याही पक्षाचा पदअधिकारी अशा प्रकारचे पाऊल उचलताना १० वेळा विचार करेल असा एक चांगला संदेश समाजामध्ये घेण्याकरता संघटना व पक्षाने याबाबतीत एक प्रकारचं उदाहरण निर्माण करावं.अशी अपेक्षा समस्त शिळ ग्रामस्थांची आहे.

## लघुलेखक संवर्गातील पदे भरा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना खा.निलेश लंके यांचे निवेदन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** महसूल विभागातील अनेक जिल्हाधिकारी कार्यालये व विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये लघुलेखक संवर्गातील अनेक पदे मोठया प्रमाणावर रिक्त झालेली असून ही पदे तात्काळ भरण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आपल्या निवेदनात खा. लंके म्हणतात, अनेक ठिकाणी लघुलेखकाऐवजी कामकाजासाठी अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांनी तिथे नेमणूक करण्यात येत आहे. त्यामुळे लघुलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. लघुलेखक या पदाची कौशल्य आर्हता अन्य कर्मचाऱ्यांपेक्षा भिन्न आहे. असे असतानादेखील लघुलेखनाचे कौशल्य अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांकडे नसताना देखील त्यांना लघुलेखन पदाचा कार्यभार दिला जात आहे. एकीकडे राज्यभरात अनेक बेरोजगार युवक-युवती लघुलेखन क्षेत्रात नोकरीची संधी शोधत आहेत. तसेच काही पात्र लघुलेखक पुढील पदोन्नतीची वाट पाहत आहेत.

**कामकाजात सुलभता येईल !**

लघुलेखक विद्यार्थी व विद्याथनींच्या मागणीचा विचार करून शासकीय कामकाजात सुलभता येईल व बेरोजगार युवक-युवतींना शासन सेवेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये रिक्त झालेली लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक, उच्च श्रेणी लघुलेखक व स्वीय सहाय्यकांची रिक्त झालेली पदे सरळसेवेने, पदोन्नतीने तात्काळ भरण्याबाबत नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याची मागणी खा. लंके यांनी केली आहे.

**लोकसेवा आयोगाची जाहिरात प्रसिध्द करा !**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दर तीन वर्षांनी मंत्रालयीन विभाग श्रेणीय कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक पदाकरिता जाहिरात प्रसिध्द केली जाते. या पदांसाठी सन २०१८ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. पुढील जाहिरात २०२१ मध्ये येणे अपेक्षित होते. मात्र कोव्हीडच्या प्रभावामुळे ही जाहिरात २०२२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली. या पदासाठी २०२५ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्याची मागणी खा. लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता !**

मागिल दोन वर्षांपासून अनेक विद्यार्थी या पदाच्या परीक्षेचा सराव करत आहेत. मात्र जाहिरात प्रसिद्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता निर्माण झालेली आहे. विद्यार्थ्यांचे वाढते वय, कुटुंबांची जबाबदारी व बेरोजगारी या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या मनावर प्रतिकूल परिणाम होतो. विद्यार्थी वर्गात नैराश्य निर्माण होत आहे. जाहिरात प्रसिद्ध करून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याची आग्रही मागणी खा. लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## प्रगतीशील, विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने वाटचाल : राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** शेतकरी, महिला, समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्याचसोबत आरोग्य, रोजगार,उद्योग,पायाभूत सोयी सुविधांच्या बळकटीकरणास शासनाचे प्राधान्य आहे. राज्य शासन सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करीत आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणात केले.

**शेतकरी हितास प्राधान्य!**

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले की, राज्यशासन कृषी क्षेत्रातील संधीचा विस्तार करून शेतकरी हितास प्राधान्य देणारे निर्णय घेत आहे. राज्यामध्ये सौरऊर्जा पंपांद्वारे शेतीकरिता पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता मागेल त्याला सौर पंप योजना या अंतर्गत, ३,१२,००० सौर पंप बसविले आहेत. या योजनेअंतर्गत, पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना १० लाख सौर पंप पुरविण्यात येतील. प्रधानमंत्री-कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या अंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करणारे देशातील पहिले राज्य बनण्याचे लक्ष्य महाराष्ट्राने ठेवले आहे. राज्याने केवळ नऊ महिन्यांच्या विक्रमी वेळेत १४७ मेगावॅट एकत्रित सौरऊर्जा क्षमतेच्या एकूण ११९ वाहिन्या कार्यान्वित केल्या आहेत.जालना जिल्ह्यामध्ये,परिसरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी, रेशीम कोशांची खरेदी व विक्री करण्यासाठी खुली बाजारपेठ उभारली आहे. बाजारपेठेचे बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच ही बाजारपेठ शेतक-यांसाठी खुली करण्यात येईल. त्यामुळे, या भागातील रेशीम उत्पादन व उत्पादकता वाढेल.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजना या अंतर्गत राज्यातील ९५ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड केली असून ८७ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना बँकांद्वारे किसान क्रेडिट कार्ड सुविधा पुरविण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा देऊन शेतकऱ्यांना सक्षम करणे हा आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी २०२४-२५ या वित्तीय वर्षात ७४,७८१ कोटी रुपये इतके पीक कर्ज वितरित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ५५,३३४ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी तत्परतेने शासन काम करीत आहे.

चालू वर्षात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत १२७४ जलाशयांमधून सुमारे चार कोटी घनमीटर गाळ काढला असून, तो ९५,००० एकर जमिनीवर पसरविण्यात आला आहे, त्याचा ३१,००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत आयोजित केलेल्या वॉटरशेड यात्रेच्या माध्यमातून पाणलोट व्यवस्थापनाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करीत आहे आणि त्यातून लोकसहभागाला प्रोत्साहन देत आहे. वॉटरशेड यात्रा ८ फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू झाली असून ती ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यातील ३० जिल्ह्यांतील १४० प्रकल्पांमध्ये जाणार आहे.

लोक सहभागातून शाश्वत भूजल व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी राज्यामध्ये अटल भूजल योजना कार्यक्षमपणे राबवित आहे. या योजनेअंतर्गत, संस्थात्मक बळकटीकरण, क्षमता बांधणी आणि अभिसरण घटकासाठी १३३६ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला आहे. त्यातून, १,३२,००० हेक्टरपेक्षा अधिक शेतजमीन लघु सिंचनाखाली आणण्यात आली आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करणा-या शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे जलद व प्रभावी वितरण सुलभ होण्यासाठी ॲग्रीस्टॅक-कृषी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या नावाची एक नवीन योजना सुरु केली आहे.

शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इथेनॉलचा पर्यायी इंधन म्हणून वापर करण्यावर भर देऊन, इथेनॉलचे उत्पादन व पुरवठ्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता, राज्यातील साखर कारखान्यांमार्फत तेल कंपन्यांना १२१ कोटी लिटर इथेनॉल पुरविण्याचे निर्धारित केलेले लक्ष्य पूर्ण करील.

शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजना या अंतर्गत, २०२४-२५ या हंगामात ५६२ खरेदी केंद्रांमार्फत ११,२१,३८५ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी केली आहे.

खरीप विपणन हंगाम २०२४-२५ मध्ये, सात लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक धान आणि १७१ मेट्रिक टनांपेक्षा अधिक भरड धान्य खरेदी केले आहे.प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री एक तालुका एक बाजार समिती योजना राबवित आहे.डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना याअंतर्गत, वैयक्तिक सौरऊर्जा कुंपण पुरविण्यासाठी संवेदनशील गावांमधील १०,००० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना १५,००० रुपयांपर्यंत अनुदान वितरित केले आहे. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पाच्या सभोवतालच्या व संरक्षित क्षेत्रांतील मानव-वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होईल. राज्यभरातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची जलद पावले उचलली आहेत. ७ लाख ८० हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना ८१४ कोटी रुपये इतके आर्थिक सहाय्य वितरित केले आहे.

बीड जिल्ह्यात परळी आणि पुणे जिल्ह्यात बारामती येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च शिक्षणाच्या संधी, शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक संसाधने याबद्दल इयत्ता ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्कुल कनेक्ट भाग २.० सुरू केले आहे. या उपक्रमात सुमारे १२०० महाविद्यालये, ४८०० शाळा व एक लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

## जुनैरा आबेद कुरेशीने केला रमजान चा रोजा (उपवास) पुर्ण



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०३, कळंब (धाराशिव) :** सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरु आहे. या महिन्यात महिनाभर उपवास धरत अल्लाहची इबादत करत असतात. इस्लाममध्ये कलमा, नमाज, रोजा, जकात, हज हे पाच प्रमुख तत्व आहे. यात सात वर्षांनंतर रोजा ठेवणे बंधनकारक आहे. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात रोजे (उपवास) करतात. कळंब येथील सात वर्षीय जुनैरा आबेद कुरेशी हिने आपल्याला देखील रोजा धरावयाचा आहे, असा हट्ट आपल्या आई-वडिलांकडे केला. यंदाचा रमजान महिना कडक उन्हाळ्यात आला आहे, म्हणून आई-वडील तीला नकार देऊ लागले. मात्र जुनैरा काही ऐकेना आणि जुनैराच्या जिद्दीपुढे आई-वडिलांनी हार मानत रोजा करण्याची परवानगी दिली तर माहिराने देखील पुर्ण दिवसभर काहीही न खाता-पिता नमाजसह रोजा पूर्ण केला.

जुनैरा आबेद कुरेशी (वय ७ वर्ष) चा रोजा पूर्ण झाल्याने तीचे आई, वडिल, मुस्लिम बांधवाकडून, मौलाना, धर्मगुरु, नातेवाईकांकडुन अभिनंदन व कौतुक केले जात आहे. जुनैरा ही कळंब येथील सुप्रसिद्ध व्यापारी आबेद कुरेशी यांची मुलगी आहे.

## पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' निमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, पनवेल :**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये आज दिनांक ०३ मार्च रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवाद वाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.

यावेळी एकुण सात अर्ज प्राप्त झाले, त्यावर कारवाई करण्याचे संबंधित विभागांना आदेश देण्यात आले.

यावेळी उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

# पिंपरी जलसेन येथील दत्तकृपा पतसंस्थेच्या लोणी मावळा शाखेत चोरीचा प्रयत्न

**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.०३, सुपा (अहिल्यानगर) :** पिंपरी जलसेनच्या दत्तकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या लोणी मावळा शाखेचे चोरट्याने शटर तोडून पतसंस्थेत चोरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना हाती काही लागले नाही. पिंपरी जलसेनच्या दत्तकृपा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची लोणी मावळा येथील बस स्थानका जवळ शाखा असून चोरट्याने काल रात्री पतसंस्थेच्या पाठीमागील बाजूस येऊन विजेच्या म टिरची वायर तोडून तेथे अंधार केला.

अंधाराचा फायदा घेऊन पतसंस्थेच्या बाहेर बसविण्यात आलेल्या सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्याच्या वायरी तोडल्या व पतसंस्थेच्या दक्षिण बाजूस असणारे शटर लोखंडी हत्याऱ्याच्या साह्याने उचकटून आत मध्ये प्रवेश करून त्यांनी प्रथम सी.सी.टि.व्ही कॅमेरे काढून



टाकले व तिजोरी गॅस कटरच्या साह्याने तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तिजोरी त्यांना तोडता न आल्याने चोरट्यांना रिकाम्या हाताने पाठीमागे जावे लागले.

या पतसंस्थेच्या शेजारील बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण पतसंस्थेची शाखा असून या पतसंस्थेची देखील मागील काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. राऊत वाडी च्या देवी भोयरे फाटा येथील राऊत बाबा पतसंस्थेच्या मागील बाजूस भिंतीला छिद्र पाडून पतसंस्थेत प्रवेश केला होता. त्या ठिकाणीही तिजोरी न फुटल्याने तेथूनही चोरट्यांना रिकाम्या हाताने जावे लागले होते.

रविवार, दिनांक ०२ मार्च २०२५ रोजी सकाळी ग्रामस्थ गावात बस स्थानक परिसरात आल्यावर पतसंस्थे त चोरी झाल्याची लक्षात आले. त्यावेळी त्यांनी संस्थेचे शाखाधिकारी राहुल लाळगे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी संस्थेचे संस्थापक चेअरमन लहुजी थोरात यांना या घटनेची माहिती दिली व त्यांनी पारनेर पोलीसांशी संपर्क साधून तक्रार दाखल केली व तदनंतर पोलिस हेड कॉन्स्टेबल मनिषा चौहान संपत लंके, जालिंदर लोंढे यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर जागेची पाहणी करून पंचनामा केला.

नेहमीप्रमाणे त्यांनी लवकरात लवकर या चोरीच्या घटनेचा तपास लावला जाईल व आरोपी जेरबंद केले जाईल असे नेहमीच्या पद्धतीचे आश्वासन देवून ग्रामस्थांचे समाधान केले.

पारनेर तालुक्यात चोरीच्या विशेषतः वा इतर घटना घडत असताना पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या नेतृत्वाखालील पोलीस कर्मचारी करता काय ? अलीकडच्या काळात पारनेर पोलीसांनी एक तरी घटनेचा तपास करून मोठा गुन्हा उघडकीस आणून मुद्देमालासह आरोपींना ताब्यात घेतल्याचे उदाहरण दिसून येत नाही. त्यांचे नेहमी प्रमाणे तपास केला जाईल, घटना उघडकीस येईल. मुद्देमाल जप्त केला जाईल. आरोपींना ताब्यात घेतले जाईल. असे थातूर मातूर उत्तर देवून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला जातो. शेवटी ज्याचे नुकसान होते, त्यालाच सोसावे लागते.

# जमाबंदी आयुक्तांना राज्यातील शेतरस्त्यांच्या गंभीर प्रश्नांसंदर्भात चळवळीचे निवेदन

**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.०३, सुपा (अहिल्यानगर) :** राज्यात दिवसेंदिवस शेत रस्त्यांच्याप्रश्नामुळे शेतजमीन पडीक पडत असून अनेक शेतकरी फौजदारी स्वरूपांच्या घटनांम ध्ये अडकत असून वर्षानुवर्ष नव्हे तर पिढ्यानपिढ्या शेतकऱ्यांचा प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष सुरूच आहे. शासन निर्णय बनतात त्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष मात्र होताना दिसत नाही. महामार्ग एवढेच शेतरस्त्यांना महत्व असून शेतरस्ता हा शेतीचा श्वास असुन समृद्ध शेतकरी बनला तर समृद्ध महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करता येईल. शेतकऱ्याचा मुख्य व्यवसाय शेती असल्याम ुळे तो शेतीसोबत शेतीपूरक व्यवसायासाठी शेतात वास्तव्यास आहे. शेतीसाठी आधुनिक यंत्रसामुग्रीच्या दळणवळणाची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली असुन तुकडेबंदी, भाऊ हिस्सेदारी, वाटपत्रानंतर शेतरस्त्यांचा प्रश्न गंभिर बनत चालला असून यासाठी ब्रिटिशकालिन शिव पानंद शेतरस्त्यांना तातडीने खुले करून हद्द निश्चित करण्यासाठी शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी डॉ.सुहास दिवसे जमाबंदी आयुक्त तथा संचालक भुमिअभिलेख महाराष्ट्र राज्य यांच्याकडे शिव पानंद शेत रस्त्यांना नंबरी लावून त्यांचे विशिष्ट कालावधी (मुदतीत) सातत्याने सर्वेक्षण सुरू करून नंबरी हटवणारांना दंड सुरू करावा. पालकमंत्री शेत/ पाणंद रस्ते योजनेस इतर शासनिर्णयात निशुल्क मोजणी असताना तालुका भुमिअभिलेखने आकारलेले सर्व शुल्क व्याजासह शेतकऱ्यांना मागे द्यावे. अतिक्रमित शासकीय शिव पानंद शेतरस्त्यांची कोणीही तक्रार दाखल केल्यास तातडीने त्यावर कार्यवाही करावी, शासकीय अधिकाऱ्यांनी शासकीय शेतरस्ता केसेस चालवाव्यात, शासकीय शिव पानंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चितीनंतर अपिलाचा अधिकार नसावा, राज्यातील सर्व शिव पानंद शेतरस्त्यांच्या अतितातडीच्या मोजण्या विहीत कालाधीत (मुदतीत) पुर्ण करा, गावनकाशावरील



सर्व बंद शेतरस्त्यांचा अहवाल घेवून तातडीने तालुका प्रशासनाला बंद रस्ते चालू करण्याचे आदेश द्यावेत त्याचबरोबर गाव नकाशावरील शेतरस्त्यांची लांबी रुंदी नकाशावर नमुद करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. सदर मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास पुढची नियोजीत दिशा लवकरच चळवळीच्या वतीने ठरवण्यात येईल. असे महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे दादासाहेब जंगले पाटील यांनी प्रसार माध्यमांना बोलताना सांगितले.

# माजी उपसभापती प्रदीप वाघ यांना लोकनेता पुरस्कार

**अक्षराज : प्रमोद मौळे**
**दि.०२, जव्हार (पालघर) :** मोखाडा तालुक्यातील जनतेची अव्हाहातपणे सेवा करणारे मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती तथा आदिवासी संघर्ष हक्क समि तीचे संस्थापक, अध्यक्ष प्रदीप वाघ यांना नाशिक लोकमत समूहाकडून लोकनेता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील हॉटेल एक्सप्रेस इन या पंचतारांकित हॉटेलमध्ये लोकमत समूहाचे उपाध्यक्ष बी.बी.चांडक आणि वृत्तसंपादक मिलिंद कुलकर्णी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.राजकारण अन् समाजकारण या एकाच नाण्याचा दोन बाजू. या दोहोंची मोट बांधत सम ाजाच्या हितासाठी धडपडणारे प्रदीप वाघ पालघर जिल्ह्याच्या विकासात मोलाची भूमिका बजावत असून समाजकंटक प्रति संवेदनशीलता, कठोर परिश्रम आणि वेळेच्या पल्याड जाऊन दिलेलं समर्पण




ही सामाजिक भावनेतून असलेली जनसेवा नव्या पिढीसाठी अनुकरणीय आणि प्रेरणादायी आहे. याच कार्याला मिळालेली लोकमान्यता ही लोकनेते असल्याचे अधोरेखित करते. म्हणून या समजकारणाच्या गौरवास्पद कार्याला आणि महत्वपूर्ण योगदानाला लोकमत समूहातर्फे प्रदीप वाघ यांना सन्मानित करण्यात आले.मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम भागात जात- पात, धर्म बाजूला सारून लोकांप्रति प्रामाणिकपणे सामाजिक कार्य सुरु असून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि राजकीय क्षेत्रातील त्यांचा आलेख उंचावत आहे. लोकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न करणे याच लोकनेत्याच्या गुणांचा कार्यगौरव व्हावा म्हणून लोकमत समूहातर्फे प्रदीप वाघ यांना लोकनेता पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक लोकमतकडून मि ळालेल्या हा बहुमान मी आदिवासी जनतेसाठी समर्पित करत असल्याचे प्रदीप वाघ यांनी सांगितले.यावेळी कादवा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्रीराम शेटे, लोकमत टाईम्सचे एडिटर रिकी मर्चंट, नाशिक व मुंबई विभाग लोकमतचे प्रतिनिधी प्रा. तुकाराम रोकडे वाकडपाड्याचे उपसरपंच नंदकुमार वाघ, पोलीस पाटील विठ्ठल गोडे, संजय वाघ, जीवन वाघ, अभिनया वाघ,सविता वाघ आदी उपस्थित होते.अवघा सोशल मीडिया झाला प्रदीप वाघ मय..! लोकमत समूहामार्फत मोखाड्याचे म ाजी सभापती यांना लोकनेता पुरस्कार मिळाल्याने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्ते, सामान्य जनता आणि सोशल मीडियातील त्यांचा चाहतावर्ग व्हाट्सअप, फेसबुक आणि इंस्टाग्रामवर सक्रिय होऊन शुभेच्छा देता होता. त्याम ुळे अवघा सोशल मीडिया झाला प्रदीप वाघ मय झाल्याचे चित्र दिसत होते.

# आषाढी यात्रेपूर्वी टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी - गहिनीनाथ महाराज औसेकर

**अक्षराज : विकास सरवळे**
**दि.०३, पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून त्याची आषाढी यात्रेपूर्वी टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी घेण्याबाबत तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन् कामाबाबत पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती मंदिरे समि तीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे सोमवार, दिनांक ०३ मार्च २०२५ रोजी मंदिर समितीची सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार



कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन संवर्धन कामाचे ठेकेदार रमेश येवले तसेच टिसीएस कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर भीमा सेखर व विविध खात्याचे खाते प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीत मंदिर जतन व संवर्धन कामाचा आढावा घेण्यात आला, त्याम ध्ये सध्या गाभारा, बाजीराव पडसाळी, सभामंडप व इतर अनुषंगीक ठिकाणी सुरू असलेली सर्व कामे आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण करून घेण्यात येणार असून, दगडी कामास कोटींग करणे व वॉटरप्रुफींगची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सूचना करण्यात आल्या.

याशिवाय, श्री विठ्ठल रूक्मिणी म तेच्या दर्शनासाठी टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित असून, त्यांचा आषाढी यात्रेपूर्वी चाचणी घेण्यासाठी व मंदिर समितीचे कार्यालयीन काम काज गतीमान करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या संगणक प्रणाली सेवाभावी तत्वावर मोफत उपलब्ध करून देण्याची मंदिर समितीची विनंती टीसीएस कंपनीने मान्य केली आहे. त्यामध्ये ऑनलाईन डोनेशन, भक्तनिवास बुकींग, पुजा बुकींग, लाईव्ह दर्शन व इतर अनुषंगीक बाबींसाठी संगणक प्रणालीचा समावेश आहे. इत्यादीबाबत निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी सांगितले.

प्रतिवर्षी चैत्र शुध्द ११ कामदा एकादशी दिवशी चैत्री यात्रा भरते. यावर्षी चैत्री एकादशी दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी संपन्न होत असून, यात्रेचा कालावधीत दिनांक २ ते १२ एप्रिल असा आहे. या यात्रा नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

यामध्ये या यात्रेला येणा-या भाविकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# थोडक्यात

## राहुरी युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या उपाध्यक्ष पदी खेमनर

**अक्षराज : वसंत रांधवन**
**दि.०२, राहुरी (अहिल्यानगर) :** दिनांक ०२ मार्च २०२५ रोजी युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या राहुरी तालुका कार्यकारीणीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार, जिल्हा प्रमुख मार्गदर्शक प्रभंजन कनिंगध्वज,



जिल्हा विधी सल्लागार दिपक मेढे यांच्या मार्गदर्शना खाली व जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा सचिव राजेंद म्हसे यांच्या प्रमुख उपस्थितीत राहुरी येथे संपन्न झाली. या प्रसंगी तालुकाध्यक्ष अशोक मंडलिक उपस्थित होते. या बैठकीमध्ये राहुरी तालुका उपाध्यक्षपदी रमेश खेमनर, सचिवपदी सोमनाथ वाघ, तर उत्तर जिल्हा संघटन सचिवपदी रमेश जाधव, संघटन सहसचिवपदी राजेंद्र पवार यांची निवड जिल्हा अध्यक्ष बाळकृष्ण भोसले व जिल्हा सचिव राजेंद म्हसे यांच्या स्वाक्षरीने निवडपत्र देऊन करण्यात आली. राहुरी येथे झालेल्या संघटनेच्या बैठकीमध्ये जिल्हा अध्यक्ष बाळकृष्ण भोसले व जिल्हा सचिव राजेंद्र म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत काही फेरबदल करण्यात आले असून जिल्हा संघटक पदी राजेंद्र पवार तर जिल्हा सहसचिव संघटक पदी आर.आर.जाधव तर राहुरी तालुका उपाध्यक्ष पदीरमेश खेमनर व राहुरी तालुका सचिव पदी सोमनाथ वाघ यांची निवड करण्यात आली. तसेच काही सदस्य संघटनेमध्ये नव्याने सामील झाले असून त्यांना ही यावेळी सर्वांच्या उपस्थितीत निवडपत्र देण्यात आले.

## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त महाबळेश्वर येथे स्वच्छता अभियान



**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.०२, महाबळेश्वर (सातारा) :** डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्यावतीने व स्वच्छतादूत पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. अप्पासाहेब तथा दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी, डॉ.श्री.सचिन दादा धर्माधिकारी, उमेश दादा धर्माधिकारी, राहुल दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त महाबळेश्वर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी महाबळेश्वर शहरातील ४ कि.मी दुतर्फा रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये कोळी आळी, गवळी मोहल्ला, नगरपालिका सोसायटी, मरीपेठ, स्कूल मोहल्ला, शिवाजी चौक, डॉ.साबणे रोड, सुभाष चौक, रे गार्डन रोड तसेच नगरपालिका कार्यालय, तहसीलदार कार्यालय येथील कार्यालयाच्या परिसरात श्री समर्थ बैठकीतील १७५ सदस्यांनी सकाळी ८.३० ते ११.५० वाजेपर्यंत करण्यात आली. अंदाजे ओला कचरा ५२० किलो व सुका कचरा २२३० किलो इतका कचरा गोळा करण्यात आला. स्वच्छता अभियान प्रसंगी नगरपालिका मुख्य लिपिक मुख्य लिपिक आबा ढोबळे, हिलदारीचे राम भोसले हिलदार टीम, शहरातील नागरिकांनी सहभाग घेतला. समाजाप्रति असलेले ऋण याची जाणीव होण्यासाठी डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान नेहमीच समाज उपयोगी सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवीत असते. आपले शारीरिक स्वास्थ्य व्यवस्थित राहण्यासाठी स्वच्छता खुप महत्त्वाची असते. याची जाणीव स्वच्छता अभियान केल्यानंतर सर्वांना होते. तसेच सामाजिक स्वच्छते सोबतच वैयक्तिक स्वच्छतेचे देखील महत्त्व सर्वांना समजते. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

## मनसेच्या वर्धापन दिनी शृंगारतळीत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.०३, गुहागर (रत्नागिरी) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १९ व्या वर्धापनदिनानिमि त्त संपूर्ण महाराष्ट्रात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून एकोणिसाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत, गुहागर मतदारसंघात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सातत्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करणारे मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या सौजन्याने रविवार, दिनांक ०९ मार्च २०२५ रोजी भवानी सभागृह, पालपेणे रोड, शृंगारतळी येथे सकाळी ०९ ते दुपारी ०२ वाजेपर्यंत, भव्य रक्तदान शिबीर तसेच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मा वाटप करण्यात येणार असल्याचे ही गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी सांगितले.

सदर रक्तदान शिबिरात गुहागर तालुक्यातील सर्व समाज व विविध संघटना सहभाग घेणार असल्याचे ही प्रमोद गांधी यांनी अधिक माहिती देताना सांगितले. जास्तीत जास्त तरुण, तरुणींनी सदर शिबिरात आपला अनमोल सहभाग नोंदवून सामाजिक हेतू, राष्ट्रसेवा हितार्थ मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन उद्योजक तसेच मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी केले आहे. सदर उपक्रमाच्या अधिक माहितीसाठी राहुल जाधव-८९७५३४८१२३ यांच्याकडे संपर्क साधावा. असे आवाहन गुहागर मनसेच्या वतीने करण्यात आले आहे.

## विभागीय लोकशाही दिन १० मार्च रोजी

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.०३, नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार, दि.१० मार्च रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.